**MSCIT परीक्षेच्यापुर्वी शासन मान्य संस्थांकडील संगणक परीक्षा अर्हतेबाबत......**

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्रमांक मातंसं/नस्ती ०७/प्रक्र ७१ /३९,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : २१ फेब्रुवारी, २००८

**वाचा** १) शासन निर्णय क्रमांक : १०९८/प्रक्र १३४/९८/३९, दिनांक ३ मार्च, १९९९
२) शासन निर्णय क्रमांक : प्रशिक्षण १०००/१४३/३९, दि.१० जुलै, २०००,
३) शासन निर्णय क्रमांक : पशिक्षण २०००/प्र.क्र. ६१/२००१/३९, दिनांक ७ ऑगष्ट,२००१
४) शासन निर्णय क्रमांक : प्रशिक्षण-२०००/प्र.क्र.५/२००१/३९, दिनांक २० जुलै, २००२
५) शासन निर्णय क्रमांक : प्रशिक्षण-२०००/प्र.क्र.५/२००१/३९, दिनांक ३० ऑक्टोबर, २००२
६)शासन निर्णय क्रमांक : प्रशिक्षण/२०००/प्र.क्र.६१/२००१/३९, दिनांक १९ मार्च,२००३
७)शासन निर्णय क्रमांक :मातंस/नस्ती ०४/२२४/३९, दिनांक २६ मे, २००४
८) शासन निर्णय क्रमांक : मातंस/नस्ती ०४/४२०/३९, दिनांक २७ जून, २००५.

**प्रस्तावना :-** संदर्भाधिन अनु. क्र. १ च्या शासन निर्णयाअन्वये शासकीय अधिकारी / कर्मचारी यांना सदर आदेशात नमूद ५ संस्थांच्या संगणक प्रशिक्षण अभ्यासक्रमास मान्यता देण्यात आली होती. अनु. क्र. २ येथील शासन निर्णयान्वये चाचणी परीक्षा (Confirmatory Test) अनिवार्य करण्यात आली होती. तसेच दिनांक ७ ऑगष्ट, २००१ च्या शासन निर्णयाअन्वये D.O.E.A.C.C. या सोसायटीचे C.C.C. किंवा "O"स्तर किंवा "A"स्तर किंवा "B"स्तर किंवा "C" स्तर यापैकी एक परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडील MS-CIT परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र संगणक अर्हता प्रमाणपत्र म्हणून विहित करण्यात आले आहे. संगणक अर्हतेबाबत शासन आता खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

***<u>शासन निर्णय :-</u>***

शासन निर्णय क्रमांक प्रशिक्षण-२०००/प्र.क्र.६१/२००१/३९, दि. ७ ऑगस्ट २००१ अन्वये शासकीय अधिकारी / कर्मचारी यांना MS-CIT परीक्षा अनिवार्य करण्यात आलेली आहे. दि. ७ ऑगस्ट २००१ च्या आदेशान्वये MS-CIT परीक्षा अनिवार्य करण्यापुर्वी संदभार्धिन अनु. क्र. १ च्या दिनांक ३.३.१९९९ च्या शासन निर्णयान्वये (१) यशवंतराव चव्हाण विद्यापीठ, (२) डीओईएसीसी सोसायटी नवी दिल्ली, (३) सीडॅक पुणे, (४) सेंटर फॉर इलेक्ट्रॉनिक्स डिझाईन ॲंड टेक्नॉलॉजी ऑफ इंडिया, औरंगाबाद व (५) तंत्रशिक्षण मंडळ महाराष्ट्र राज्य, मुंबई अशा एकूण पाच संस्थांकडून त्यांच्या नावासमोर दर्शविलेला संगणक प्रशिक्षण पाठयक्रम विहीत करण्यात आला होता. या शासन निर्णयाअन्वये MS-CIT परीक्षेपुर्वी म्हणजे दि. ७ ऑगस्ट २००१ पुर्वी ज्या अधिकारी / कर्मचाऱ्यांनी शासनाने विहित केलेली संगणक अर्हता वरील शासन मान्य संस्थांमधुन उत्तीर्ण केली असेल त्यांनी विहित संगणक परीक्षा उत्तीर्ण केली असल्याचे समजण्यात येईल. तथापि उपरोक्त शासन पुरस्कृत संस्थामधुन परीक्षा उत्तीर्ण



http://www.maharashtra.gov.in/data/gr/marathi/2008/02/21/20080221182510001.pdf